

॥श्री॥

दि. ३१-ऑक्टोबर-०३

नमस्कार मंडळी,

मराठी मंडळाचा गणपती उत्सवाचा सोहळा थाटात साजरा झाला. लहान मुलांनी सादर केलेल्या कार्यक्रमची सगळ्यांनीच प्रशंसा केली. मंडलातल्या महिलांनी मेहनत घेऊन केलेल्या जेवणाची सगळ्यांनी भरपुर प्रशंसा केली. आता मंडळी लक्ष ठेवा दीवाळींच्या कार्यक्रमां कडे.

पत्रकाच्या या अंका मधे खाली वाचा श्री. पराग सोहनी ह्यांनी खास भारतातुन पाठवलेली मराठी कविता आणी सौ. मंदा शुके ह्यांनी लीहलेला लेख.

ए तिला कशाला सांगितल की
माझं तिच्यावर प्रेम आहे
आता तिच्या बापाला कळालं
तर फुकट माझ्यावर गेम आहे

साला सांगितला कुणी तुम्हाला आगाऊपणा करायला
माझा टाका भिडत असतान मध्ये तंगड्या घालायला
उगा शानपत्ती करु नका
नाजुक माज़ं प्रेम आहे
काही झाल तरी
शेवटी आपल्यावरच गेम आहे

तसं तिच्या बापाला काय आपण मरणाला सुद्धा घाबरत नाही
प्रेमात साला मरायच असेल तर प्रेमाचा काय उपयोग नाही
तुम्ही घाबरुन प्रेम केलत?
तुमच्या प्रेमावर शेम आहे
आणि काही झाल तरी
शेवटी आपल्यावरच गेम आहे

माहिती आहे  यार !!! आपल्याला ती भाव दे त नाही
पण प्रेम केलाय तिच्यावर बघतोच कशी ऐकत नाही
ती अशी ऐकायची नाही
ती पण मोठी मेम आहे
म्हणुनाच तर म्हणतो यार
शेवटी आपल्यावरच गेम आहे

तो शेजारच्या गल्लीतला बाबुभाई, नेहमीच तिच्यावर टवके टाकतो
एकदा आपल्या एरियात येउ दे बघाच त्याला कसा झापतो
जाऊ दे  ना! ती त्याला पण भिक घालत नाही
त्याची पण कंडीशन सेम आहे
तरी पण आपल्याला वाटत साला
शेवटी आपल्यावरच गेम आहे

अरे अप्सरा पण फ़िक्या पडतिल असा शपथीक आपला माल आहे
पहाल तर तुम्ही पण म्हणाल येह तो कुदरत का कमाल है
कभी उधर तो कभी इधर
ह्या चिकन्या पोरीचा काय नेम आहे
म्हणुन तर आपण म्हणतो
शेवटी आपल्यावरच गेम आहे

आपल्याला पण सेटल व्हायचय यार पण ही पोरगी काय पटत नाही
आपण पण फ़ेविकॉल लावुन बसलोय साला आपण पण हटत नाही
आपल्या लव्ह लाईफ़ मध्येच लोचा
बाकी सार क्षेम आहे
आता तरी कळाल ना!!!
शेवटी आपल्यावरच गेम आहे...

# अेक विस्मरणीय प्रवास

१९९० मधे आम्ही दोघांनी युरोपच्या प्रवासाला जायचे ठरवले. त्यादृष्टीने कोणत्या प्रवासी कंपनीची टुर घ्यावी ? किती दिवसाची सुट्टी काढावी लागेल ? कोठली टुर आपल्या खिशाला परवडण्या सारखी आहे ? अशा सर्व गोष्टींचा विचार करुन शेवटी अेस. ओ. टी. सी. ने जायचे ठरवले. युरोपला अनेक शतकांचा इतिहास आहे, म्हणून पुष्कळ अैतिहासिक स्थळं बघण्यासारखि आहेत. शिवाय निसर्गाचं वरदान. आणि मानवाने विज्ञानातून साधलेली प्रगति त्यादृष्टीने पण अनेक स्थळ पहाण्यासारखि आहेत. खुप अेक्साईटमेंट होती. शिकागोत राहणारा माझा मोठा भाऊ (आण्णा) व वहिनी पण आमच्याबरोबर प्र वासात सामिल झाले.

शिकागोहून आम्ही लंडनला गेलो. लंडनहून अेस. ओ. टी. सी. च्या प्र वासाला सुरुवात झाली. फान्स,ईटली मधील प्रसिध्द शहरं - स्थळ बघून झाल्यावर आम्ही स्विझर्लंडला आलो. तेथे ५ दिवस राहणार होतो. झुरिच,जिनीव्हा,ईंटरलॅकन ई. मोठी शहरं बघून झाल्यावर अम्ही लॅक्सला आलो. आल्पस् पर्वतरांगाच्या कुशीत वसलेल देखणं गांव पाहुन मन हरखुन गेलं. दऱ्या,
खोऱ्या, तेथील हीरवळ,ऊंच ऊंच झाड, या सगळ्यामधुन डोकावणारी टुमदार घरं. हे सगळं इतकं सुंदर दिसत होत. इथल्या कार्यक्रमात रोप-वे (केबल-कार) घेवुन एका पर्वत शिखरावर जायचं होत. एक छोटसं गाव होते त्याचे नाव होते फिलम ड्रॉफ
तेथेन केबल कारने शिखरावर जायच होत. केबल-कारने वर जात असताना आजुबाजुच दृष्य डोळ्याच पारणं फेडील असं होत. चहुबाजुने आल्पस् पर्वतांच्या रांगा, दुरवरची व उंच शिखरं बर्फा च्छादीत होती, खाली बधितल तर हिरव्या गार दऱ्या,लाल छप्परांची छोटी छोटी घरं,हिरव्या कुरणांवर चरत असलेल्या खुप गाई, त्यांच्या गळ्यातील घंटांचा नाद. सार काही एखाद्या चित्रा कडे बघाव असं वाटत होत.

केबल-कारचं पहील स्टेशन गेल, तो पर्यत पर्वताचा मोठा भाग चढुन आलो होतो. हा पहीला टप्पा होता. इथुन आता दुसऱ्या टप्प्यावर म्हणजे शिखरावर जायचं होत. हा दुसरा टप्पा जवळ जवळ ६०० फुट होता. या ठीकाणी
आम्हाला कांही लोक पायी चढत-ऊतरत असतानां दिसत होते. शिखरावर पोहोचल्यावर सगळीकडच द ष्य फारच मनोहर दिसत होत. बराच वेळ वेगवेगळ्या बाजुने निसर्ग शोभा बघितल्यावर, आता खाली जायच ठरल. वर येत असताना बघितलेल्या त्या दऱ्या, ती हिरवळ, त्या गाईच्या गळ्यातील घंटांचा नाद सर्व डोळ्यात साठलेल होत. मनांत आल उतरताना केबल कारने न जाता पायी जावं. डोंगर तसा खड्या चढणीचा नव्हता. पायी उतरणं सोप वाटत होत. शिवाय वर येत असताना काही लाकं चढत - उतरत असताना दिसली होती. अरविंदना

विचारल आपण पायी ऊतरुन जायचं का? तर ते तयार नव्हते. आण्णा व वहिनी पण तयार नव्हते. पहिल्या स्टेशन पर्यंत पायी जाऊ व नंतरचा पहाडाचा मोठा भाग आहे तो केबल-कारने ऊतरुन जाऊ. असं ठरवुन ग्रुप मधल्या बऱ्याच जणांना विचारल. पण कोणीच तयार झाले नाहित. मी पण जिद्दीला पेटले. मी म्हटल मी पायी जाते. अरविंद व आण्णा वहिनींनी मला परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. मी म्हटल मी तुम्हाला खाली भेटेन. त्या दिवशी इतर काही कार्यक्रम नसल्याने आरामात ऊतरुन जायचं ठरवल व ऊतरायला सुरुवात केली.

केबल-कारची खुण मनांत ठेवली. जस जश्या केबल-कार जात आहेत तस त्या दिशेला जायच म्हणजे मधल्या स्टेशनला पोहचू. सुरवातीला भरभर खाली ऊतरत गेले. केबल-कार मधुन माणस खाली जातांना दिसत होतो. त्याचं बोलणं ऐकु येत होत. अधून मधून कोणी हाय हॅलो म्हणून मला आवाज देत होते. त्यामुळे वस्ती वाटत होती. सुरवातीचा अर्धा पाउण तास केबल कार्स दिसत होत्या नंतर लक्षात आल की केबल कार्सच वर खाली जाण बंद झालय. मला कळेना काय झाल! वीज पुरवठा बंद झाला असेल का? इथे पण भारतासारखा वीज पुरवठा मधेच बंद होतो की काय? ठीक आहे. केबल्स तर दिसताहेतनं, मग त्या दिशेने जायचं. मला वाटत होत की आणखीही कांही लोक खाली उतरताना भेटतील. पण इथे तर एक सुध्दा माणुस खाली उतरताना दिसत नाहिये. मनाला बजावलं - पॉझिटीव्ह थिंकींग करायच! आजुबाजुच्या निसर्गाची शोभा पहात मजेत उतरायच. इतर कोणी आहेत नाहीत ऐवढ्या अफाट परीसरात आपण ऐकटेच आहोत हा विचार काढुन टाकायचा. आता वर लक्ष गेल तर केबल्स डोक्यावरुन जाताना दिसत नव्हत्या. त्या दुर गेलेल्या दिसत होत्या. निसर्ग शोभा पहाण्यात केबल्सकडे दुर्लक्ष झाल की काय?आता मी या डोंगरांच्या रांगात कुठे तरीच भरकटले की काय? मी त्या मधल्या स्टेशनच्या छोट्या इमारतीपर्यंत पोहोचणार की नाही? सगळेच प्रश्न?

थोडा वेळ शांतपणे थांबले. दुरवर का असेना केबल्स दृष्टीच्या टप्प्यात आहेत तर त्याच दिशेनी जायचं. अशा आणीबाणीच्या वेळेस जे सर्वांच होतं तेच माझ झालं! म्हणजे काय? तर देवाची आठवण झाली. देवाची प्रार्थना! रामरक्षा मोठ्याने म्हणायला सुरवात केली. रामरक्षा म्हणुन झाली. मारुती स्तोत्र म्हणुन झालं. जेवढे श्लोक आठवत होते ते म्हणुन झाले. मोठ्याने म्हटल्याने मला माझीच सोबत वाटु लागली. ऐकायला तेथे कोणी नव्हतच, तेव्हा न संकोचता माझ आपल मोठ्याने म्हणणं चालु होत. भक्तिगीत ,भजन म्हणु लागले. माझ आवडत भजन " जेथे जातो तेथे, तु माझा सांगाती, चालवीसी हाती धरुनीया " म्हणुन झाल. देवाला माझी दया आली बहुतेक! केबल्स आता जवळ दिसु लागल्या. खाली उतरण्याची जी पायवाट होती ती वळुन पुन्हा योग्य मार्गावर येते आहे अस दिसल्याने जीवात जीव आला. आतापर्यंत दोन तास झाले होते. आता मला हसुं येत होत याच की या आल्प्सने आपल्या संस्कृत भाषेतील रामरक्षा, मराठी भजनं, भी गीत कधी ऐकली असतील का? कदाचित असतीलही - जर माझ्यासारखे कोणी वेडे लोक इथे येउन त्यांनीही असाच डोंगर चढण्या - उतरण्याचा पराक्रम केला असेल तर त्यांनीही गाणी, भजनं म्हणत म्हणत रस्ता पार केला

असणार.

दोन अडीच तासानंतर प्रथमच मला एक माणुस दिसला. त्याला इंग्रजीतुन विचारलं की केबल कारच स्टेशन इथुन किती दुर आहे? तो माझ्याकडे पाहुन हसला व म्हणाला " नो इंग्लीश ". त्याला इंग्रजी भाषा येत नव्हती. पुढे आणखीही कांही लोक दिसले, त्यांना पुन्हा विचारल, त्यांनीही " नो इंग्लीश " म्हणुन उत्तर दिल. ठीक आहे! ज्या अर्थी आता कांही लोकं दिसताहेत त्या अर्थी जवळपास कोठे तरी हे स्टेशन असाव. अजुनही केबल कार्स सुरु झाल्या नव्हत्या. शेवटी अेकदाच मला ते केबल स्टेशन दिसल. चौकशीअंती कळल की दुपारी १ ते ३ केबल कार्स बंद ठेवतात. १५ , २० मिनिटांत परत सुरु होतील, कळल. तेथील बाकांवर विश्रांती घेत बसले. पाय फार दुखत असल्याची जाणीव आता झाली.

केबल कारने खाली आले. अरविंद माझीच वाट पहात गेले २ तास तेथेच थांबले होते. बाकी सगळे लोकं हॉटेलवर परतले होते. अरविंदना पाहील्यावर इतक बर वाटलं , तसच त्यांनाही वाटल कारण त्यांना काळजी वाटत होती की कोठे व ही चुकून हरवली तर नाही नं - आणी तसं झालं तर पुढे काय करायचं? आधी ते खुप रागावले. अशा परक्या देशात अेकटीने चालत यायच काय अडलं होत? आम्ही सर्व इथे कीती काळजीत होतो. आण्णा तर फारच अपसेट झाला आहे. वगैरे वगैरे.चुपचाप सगळं ऐकून घेतल. न ऐकून जाते कोठे? बराच वेळ बोलुन झाल्यावर म्हणाले, तू फार दमुन गेली असशील, मी तुला वर आणखी लेक्चर देतोय. तूझं खंर तर अभिनंदन करायला हवं , हिंमत ठेवुन म्हटल्या प्रमाणे डोंगर उतरुन व्यवस्थितपणे आलीस.

या केलेल्या छोटयाशा धाडसाचा पश्चाताप मात्र कधीही झाला नाही. स्विझर्लंडमधील त्या आल्पस पर्वतांच्या रांगाच ते सुंदर दृष्य मी कधीही विसरणार नाही. तो माझ्या आयुष्यातला एक अविस्मरणीय प्रसंग ठरला.

मंदा गोडबोले शुके